# सातारा जिल्हा परिषद,सातारा

## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२)२३८१२६ फॅक्स नं.२३०६०१ E-mail -: dyceogadstr@gmail.com

**कालमर्यादा**

जा.क्र.साप्रवि/आस्था-२(५)/कावि-१०/२०१८
दिनांक -:२७: ०४ : २०१८

**प्रति,**

**संबंधित खाते प्रमुख -----------------------------------**
**जिल्हा परिषद सातारा**
**गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती ----------------------**

विषय -: सामान्य प्रशासन विभागाकडील संवर्ग- सर्वसाधारण बदल्या सन २०१८
संदर्भ -: महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५/५/२०१४ व शुध्दीपत्रक दिनांक २/७/२०१४ व ०२/०१/२०१७.

ग्राम विकास व जल संधारण विभाग मुंबई यांचे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील विहित केलेल्या सुधारीत धोरणानुसार व त्यामध्ये विहीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण करणेबाबत कळविले आहे.

आपल्यास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, दिनांक १५ मे २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील सुधारीत तरतुदीनुसार, सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या संवर्गातील कर्मचारी यांची अनुक्रमे प्रशासकीय, विनंती व आपसी बदलीसाठी बदलीपात्र कर्मचारी यांची यादी तयार केली असून, ती यासोबत पाठविण्यात येत आहे. **तसेच सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.** तरी वरील संवर्गाच्या वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणल्याबाबत सर्व संबंधिताच्या स्वाक्षरी घेण्यात यावी. तसेच सदर यादीबाबत कर्मचारी यांच्या काही हरकती/सुचना/आक्षेप आणि तक्रारी असल्यास त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह दिनांक०३/०५/२०१८ पर्यत आस्थापना लिपीकाने समक्ष या कार्यालयास सादर करुन, संबंधितांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेली वास्तव्य सेवा जेष्ठता यादी या कार्यालयास दिनांक०३/०५/२०१८ रोजी सादर करावी. वरील विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार उदभवल्यास त्यास सर्वस्वी आपले कार्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन, वरीलप्रमाणे विहित केलेल्या मुदतीत, हरकती/सुचना/आक्षेप व तक्रारी, त्याबाबतचे पुरावे याची माहिती व संबंधितांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेली वास्तव्य सेवा जेष्ठता यादी सादर करणेची दक्षता घ्यावी.

२७/४
( सत्यजीत बर्डे )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा करीता.**

**प्रत :- सातारा जिल्हा परिषद, नोटीस बोर्ड प्रसिध्दीकरीता..**